**विशेष लेख क्र.१७**

६ चैत्र १९२९ शके (सायं. ५.३० वा.)
बुधवार, दि. २६ मार्च २००८

# पंपकीन हाऊस : एका ध्येयवेड्याची स्वप्नपूर्ती

***ध्येयाने प्रेरित झालेली माणसं मार्गात येणाऱ्या अडचणी दूर करुन ध्येयपूर्तीच्या दिशेने मार्गक्रमण करीत असतात. त्यात त्यांची दूरदृष्टी, सामाजिक बांधिलकीची जाणीव, हाती घेतलेल्या कामाबद्दल जिव्हाळा आणि प्रामाणिकपणा दिसून येतो. पंपकीन हाऊस ही संस्था दारिद्र्य रेषेखालील गरीब निराधार बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेच्या कार्याचा आढावा घेणारा हा लेख . . .***

आपण भोगलेले गरीबीचे चटके इतर गरीब मुलांच्या वाट्याला येऊ नयेत यासाठी श्री.मॅन्युअल पिल्ले या ध्येयवेड्या माणसाने दारिद्र्य रेषेखालील गरीब निराधार बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अहमदनगर जिल्ह्यात पंपकीन हाऊस सुरु केले आहे. या शिशुगृहाला त्यांनी दिलेले नांव अत्यंत समर्पक आहे. पंपकीन हाऊस म्हणजे भोपळ्याचे घर. या भोपळ्याचे लहान मुलांना नेहमीच आकर्षण वाटत असते. या नावावरुन लहानपणी ऐकलेली गोष्ट आठवते. या गोष्टीतील म्हातारीला तिच्या लेकीला भेटावयास जावयाचे असते. परंतु रस्त्यात एक राक्षसीण राहत असे ती आपल्याला खाऊन टाकेल, या भीतीने म्हातारी एका मोठ्या भोपळ्यात बसून लेकीकडे जाते. भोपळ्यात बसल्यावर ती म्हणायची 'चल रे भोपळ्या टुणूक टुणूक ऽ ऽ ऽ' तसा भोपळा चालू लागायचा. हावभावासहीत सांगितलेली ही गोष्ट ऐकताना त्यावेळी फारच मजा वाटत असे. या गोष्टीचा आम्हा मुलांवर इतका पगडा होता की, रस्त्यातून एखादा लठ्ठ माणूस किंवा वर्ग मित्र चालत जात असला की, त्याला उद्देशून आम्ही चल रे भोपळ्या टुणूक टुणूक म्हणत चिडवत असू. लहान मुलांना भोपळ्याबद्दल असलेल्या आकर्षणाची सांगड जणू श्री.पिल्ले यांनी घातली आहे. गोष्टीतील म्हातारी भोपळ्यातून लेकीला भेटावयास जाते तर आता ही निराश्रित बालके या भोपळ्यात विसावून भविष्यात उत्तम नागरीक बनणार आहेत.

पिल्ले दांपत्यांना गेल्या दहा वर्षापासून दारिद्र्य रेषेखालील गरीब व निराधार मुलांसाठी काहीतरी करावे, असे वाटत होते. आपण लहानपणी भोगलेले गरीबीचे चटके या मुलांना बसू नयेत, त्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी आणि स्वत:च्या पायावर उभे राहावे याचा त्यांनी ध्यास घेतला होता. सामान्य कुटुंबातील या पती-पत्नीने एवढा असामान्य विचार करावा हे कौतुकास्पद आहेच त्याहीपेक्षा त्यांच्या धाडसाचे कौतुक व्हायला हवे.

मॅन्युअल पिल्ले यांचे वडील ३० वर्षांपूर्वी अहमदनगर येथे आले. सुरुवातीस त्यांनी तेथे सैनिकांचे कपडे शिवण्याचे काम सुरु केले. दोन-तीन वर्षानंतर त्यांनी कुटुंबालाही अहमदनगर येथे आणले. गरिबीमुळे श्री. पिल्ले यांचे आठवीपर्यंतच शिक्षण झाले. वडिलांना त्यांच्या कामात मदत करावी लागे. त्यामुळे या व्यवसायातील तुटपुंज्या आर्थिक मिळकतीतून कुटुंब चालविणे तसे अवघडच असायचे. त्यामुळे गरिबीचे चटके त्यांना लहानपणी सहन करावे लागत होते. त्यातूनच त्यांचा आपण गरीब निराधार मुलांसाठी काहीतरी करावे असा मनोनिग्रह होत गेला.

सुदैवाने पत्नी श्रीमती स्टेला त्यांना साथ देणाऱ्या मिळाल्या. श्रीमती स्टेला यांचे लग्नाच्या वेळी डी.एड पर्यंत शिक्षण झाले होते. श्री.पिल्ले यांनी पत्नीस पुढे शिक्षण चालू ठेवण्यास सांगितले. आपले शिक्षण झाले नाही परंतु पत्नीने शिकून आपल्या विचारांना मूर्त स्वरुप द्यावे अशी त्यांची इच्छा होती. श्री.पिल्ले यांच्या प्रोत्साहनामुळे

..२/-

श्रीमती स्टेला यांनी त्यानंतर समाजशास्त्रातील एम.ए. तसेच शिक्षणातील पदव्युत्तर पदवी संपादन केली. आज त्या अहमदनगर येथे दारिद्र्य रेषेखालील लहान मुलांसाठी असलेल्या मेहेर इंग्लीश स्कूलच्या प्राध्यापिका तसेच पंपकीन हाऊसच्या विश्वस्त म्हणून काम पाहतात.

मॅन्युअल पिल्ले दांपत्यांनी १० वर्षापासून जोपासलेले स्वप्न प्रत्यक्षात येण्यास २००३ साल उजाडले. पंपकीन हाऊसची स्थापना २००३ मध्ये त्यांच्या घरी झाली आणि २००५ मध्ये त्याची नोंदणी करण्यात आली. सुरुवातीला रेल्वे स्टेशनावरील भटकी मुले, इतर आश्रमशाळेत जागा उपलब्ध नसल्यामुळे प्रवेशापासून वंचित राहिलेली निराधार मुले किंवा ओळखीच्या माणसांकडून आलेली निराधार बालके यांना पंपकीन हाऊसमध्ये प्रवेश देण्यात आला. यासाठी श्री.पिल्ले स्वत: या बालकांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना भेटले आणि या बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पंपकीन हाऊसमध्ये दाखल होण्याची विनंती केली. काही वेळा त्यांना यात यश आले तर काही वेळा निराशा पदरी पडली. परंतु ध्येयाने झपाटलेला हा माणूस आपल्या मार्गापासून विचलीत झाला नाही.

आज पंपकीन हाऊसमध्ये २ ते १२ वयोगटातील दारिद्र्य रेषेखालील निरीश्रित ३४ बालके असून यामध्ये आई किंवा वडील नसलेली २४, घटस्फोटीत पालकांची ५, तर ५ अनाथ मुलांचा समावेश असून ती ख्रिश्चन, हिंदू मराठा तसेच मागासवर्गीय समाजातील आहेत. या असहाय्य बालकांची वाढ शिक्षण घेत घेत इतर मुलांबरोबर व्हावी, गरिबीचे दुष्टचक्र भेदून या मुलांनी भविष्यात कार्यक्षम युवक बनावे यासाठी पंपकीन हाऊसच्या विश्वस्तांनी स्वत:ला झोकून दिले आहे. या मुलांची सामाजिक परिस्थिती भिन्न असली तरी त्यांच्यातील सुप्तगूण शोधून त्यांची कार्यक्षमता जोपासण्यास ही मंडळी मदत करीत असतात. या पृथ्वीतलावरील प्रत्येक बालकाचा आम्ही आदर करतो. या बालकांना खास दैवी देणगी आणि गुणवत्तेचा वरदहस्त लाभलेला असतो असा आमचा विश्वास आहे, असे श्री.पिल्ले यांनी पंपकीन हाऊस संदर्भात बोलताना सांगितले.

३ ते ५ वर्षांच्या निराधार बालकांना दत्तक घेणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि त्यांना प्राथमिक शिक्षण देणे हे पंपकीन हाऊसचे ध्येय असून त्यापुढील त्यांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी स्वत:ची शाळा सुरु करण्याचा मानस असल्याचेही श्री.पिल्ले यांनी सांगितले. तोपर्यंत या मुलांच्या पुढील शिक्षणाची सोय मेहेर इंग्लीश हायस्कूलमध्ये करण्यात येणार आहे. ही शाळादेखील गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी नगर जिल्ह्यात प्रसिद्ध आहे, त्यामुळे प्रवेशास अडचण येणार नाही, असेही श्री. पिल्ले म्हणाले.

जागतिक आव्हानाला सामोरे जाण्यासाठी या बालकांना इंग्रजी भाषेतूनच शिक्षण दिले जाते, असेही श्री.पिल्ले यांनी सांगितले. पंपकीन हाऊसमध्ये दाखल केलेल्या प्रत्येक मुलामागे क्रमिक पुस्तके, बॅग, स्टेशनरी, फी, प्रवास, कपडे, वैद्यकीय मदत, निवारा आणि जेवण यासाठी वर्षाला साधारणपणे ४५ हजार रुपये खर्च येत असून मागील दोन वर्ष विश्वस्त हा खर्च स्वेच्छेने जमा झालेल्या निधीतून तसेच मित्रांकडून मिळालेली मदत यातून करतात. ही मदत आर्थिक किंवा वस्तूरुपाने स्वीकारली जाते. सर्व सोंगे करता येतात परंतु पैशाची सोंगे करता येत नाहीत. ध्येय फार मोठे आहे परंतु निधीअभावी मार्गात अडचणी फार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अधिक माहितीसाठी आपणास पंपकीन हाऊस फॉर चिल्ड्रन ट्रस्ट, विद्यानगर, नगर-दौंड रोड, अहमदनगर-४१४००५, दूरध्वनी क्रमांक ९१-२४१-२५४८५४०, ई-मेल stella46@rediffmail.com येथे संपर्क साधता येईल.

**- प्रकाश मळेवाडकर**
**1956prakash@gmail.com**

. . . . . .